प्रेसनोट

दिनांक ११/०७/२०१८

**उपअधिक्षक, भुमी अभिलेख कार्यालय किनवट येथील शिपाई विवेक पांडुरंग खुडे यांनी १००/—रु. लाच स्विकारल्यानंतर नांदेड लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने लाचेच्या रक्कमेसह रंगेहात पकडले.**

यातील तक्रारदार यांनी दिनांक ११/०७/२०१८ रोजी कार्यालय पोलीस उप अधिक्षक, लाचलूपत प्रतिबंधक विभाग नांदेड येथे तक्रार दिली की, " **त्यांचे वडीलांचे नावे मौजे मांडवी शिवारात सर्व्हे नंबर ८५ मधील शेतीचा टोच नकाशा उप अधिक्षक, भुमी अभिलेख कार्यालय किनवट येथून काढून देण्यासाठी कर्मचारी खुडे यांनी १००/—रू. ची लाचेची मागणी करीत असल्याची तक्रार दिली**".

सदर तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक ११/०७/२०१८ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड कार्यालयाकडुन उपअधिक्षक भुमी अभिलेख किनवट कार्यालयाचे परिसरात पंचासमक्ष केलेल्या लाच मागणी पडताळणी मध्ये खुडे यांनी तक्रारदाराचे **यांचे वडीलांचे नावे मौजे मांडवी शिवारात सर्व्हे नंबर ८५ मधील शेतीचा टोच नकाशा उप अधिक्षक, भुमी अभिलेख कार्यालय किनवट येथून काढून देण्यासाठी** तक्रारदार यांचेकडे १००/— रुपये लाचेची मागणी करून स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले.

आज दिनांक ११/०७/२०१८ रोजी उपअधिक्षक भुमी अभिलेख किनवट कार्यालयाचे परिसरात लावण्यात आलेल्या सापळयामध्ये आरोपी लोकसवक विवेक पांडूरंग खुडे यांनी तक्रारदार यांचे नमुद कामासाठी पंचा समक्ष १००/—रू. लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर त्यांना लाचेच्या रक्कमेसह रंगेहात पकडण्यात आले आहे.

प्रस्तुत प्रकरणी पोलीस स्टेशन किनवट जि.नांदेड येथे आरोपी लोकसेवक विवेक पांडूरंग खुडे, वय २८ वर्ष, शिपाई, नेमणुक उप अधिक्षक, भुमी अभिलेख कार्यालय किनवट ता.किनवट राहणार श्री चैतमवार यांचे वाडयात, राजेंद्रनगर किनवट जि. नांदेड मुळ राहणार खूडेवाडी ता.कंधार जि.नांदेड यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ नुसार गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

तरी सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी हे शासकीय काम करण्यासाठी लाचेची मागणी करीत असल्यास तसेच त्यांचे लाचेच्या मागणीचे मोबाईल फोनवर लोकसेवक यांचे एसएमएस किंवा व्हिडीओ, ऑडीओ क्लिप असल्यास, भ्रष्टाचार संबधाने कांही माहिती असल्यास किंवा माहिती अधिकारात शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी शासकीय निधीचा भ्रष्टाचार केला असेल तर खालील कंमाकावर संपर्क करावा.

१) टोलफ्री हेल्पलाईन कंमाक :— १०६४ (२) कार्यालयाचा फोन कंमाक ०२४६२—२५३५१२

३) श्री संजय कुलकर्णी, पो.उप अधि.यांचा मोबाईल कंमाक ८५५४८५२९९९

Website :- www.acbmaharashtra.gov.in, Mobile App :- www.acbmaharashtra.net

Facebook Page :- www.facebook.com/MaharashtraACB

कार्यालय, पोलीस उप अधिक्षक ला.प्र.वि. नांदेड युनिट

(संजय कुलकर्णी)
पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड.